ePaper
उत्तर प्रदेशात 'शिंदे प्रयोग'? ; अखिलेश यादवांचा के पी मौर्यांना प्रस्ताव



| वर्ष - 6 | अंक - 150 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार। दिनांक 8 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ठरलं...आता 100+

## आमदार लक्ष्मण जगताप यांचा निर्धार, भजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत चर्चा

**पिंपरी ।।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत दुसऱ्यांदा भाजपाचे 'कमळ' फुलवण्यासाठी बावनकुळे आणि जगताप बंधू यांच्यात राजकीय रणनिती ठरली आहे. निवडणुकीत विरोधकांचा धुव्वा उडवून भाजपाचे १०० हून अधिक नगरसेवक निवडून आणणारच, असा विश्वास आमदार लक्ष्मण जगताप यांनी व्यक्त केला आहे.

भाजपाचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. ७) आमदार लक्ष्मण जगताप यांची पिंपळेगुरव येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यांनी आमदार जगताप यांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीबाबत आमदार जगताप आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक



प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांच्यासोबत चर्चा केली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी आमदार जगताप हे लवकरच ॲक्शन मोडमध्ये येणार असल्याचे सांगितले.

विधान परिषदेचे आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांची भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र दौरा सुरू केला आहे. ते बुधवारी ७ सप्टेंबर रोजी पिंपरी-चिंचवडमध्ये होते. त्यांनी सर्वात आधी आमदार लक्ष्मण जगताप यांची त्यांच्या पिंपळेगुरव येथील निवासस्थानी जाऊन भेट घेतली. बावनकुळे यांनी आमदार जगताप यांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू आणि भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप व त्यांच्या कुटुंबातील इतर सर्व सदस्य उपस्थित होते. आमदार जगताप यांची तब्येत आता ठणठणीत झाल्यामुळे बावनकुळे यांनी देवाचे आभार मानले.

### भजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह...

दरम्यान, भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे हे आमदार लक्ष्मण जगताप यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेण्यासाठी येणार असल्यामुळे भाजपच्या अनेक पदाधिकारी व माजी नगरसेवक उपस्थित होते. बावनकुळे यांनी प्रत्येकाची भेट घेत आगामी महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड भाजपमध्ये उत्साह संचारला असून, आगामी काळात महापालिका निवडणुकीसाठी भाजपकडून आणखी जोरदार मोर्चेबांधणी केली जाणार असल्याचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी सांगितले.

### पक्षनिष्ठेचा चेहरा आमदार जगताप...

आजारपणामुळे डॉक्टरांनी प्रवास टाळण्याचा सल्ला दिलेला असतानाही राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत मुंबईपर्यंत एम्ब्युलन्सने प्रवास करून पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी मैदानात उतरून मतदान केल्याबद्दल बावनकुळे यांनी आमदार जगताप यांचे विशेष आभार मानले. "पक्षनिष्ठेचा दुसरा चेहरा म्हणजे आमदार लक्ष्मण जगताप", अशा शब्दांत बावनकुळे यांनी त्यांच्या पक्षनिष्ठेला यावेळी सलाम केला. आमदार लक्ष्मण जगताप हे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील भाजपचे हुकमी एक्का आहेत. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत आमदार जगताप यांच्या नेतृत्वाखाली भाजपने माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताब्यातील पिंपरी-चिंचवड महापालिका जिंकण्याचा राजकीय चमत्कार घडवला होता. त्यामुळे महापालिकेच्या आगामी निवडणुकीबाबत बावनकुळे यांनी आमदार जगताप व चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांच्याशी चर्चा केली. शहरातील सध्याच्या राजकीय परिस्थिती बावनकुळे यांनी जाणून घेतली. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे आणि जगताप बंधू यांच्यात पिंपरी-चिंचवड महापालिका दुसऱ्यांदा जिंकण्याची रणनिती ठरल्याचे सांगण्यात येत आहे. महापालिका निवडणुकीत आमदार महेश लांडगे यांच्या साथीने १०० पेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणू, असा विश्वास आमदार जगताप यांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी दिला आहे. भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनीही महापालिका निवडणुका कधीही जाहीर होऊ देत, आम्ही पुन्हा महापालिका जिंकण्यासाठी सज्ज असून, सर्व राजकीय तयारी झाल्याचे सांगितले. पिंपरी-चिंचवडमधील जनताही पुन्हा पाच वर्षे सेवा करण्याची भाजपला संधी देण्याच्या मानसिकतेत असल्याचे ते म्हणाले. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार लक्ष्मण जगताप हे पुन्हा लवकरच ॲक्शन मोडमध्ये येणार असल्याचे सांगितले.

# सायन्स सिटी प्रकल्पाला मूर्त स्वरूप देणार!

## शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे आश्वासन, महापालिकेच्या सायन्स पार्क आणि तारांगण प्रकल्पाला भेट

**पिंपरी । महाईन्यूज ।**

सायन्स सिटी विकसित करण्याचा महापालिकेचा प्रकल्प स्तुत्य असून याला मूर्त स्वरूप देण्यासाठी राज्य शासन आवश्यक ते सर्व सहकार्य करेल असे आश्वासन शालेय शिक्षण मंत्री केसरकर यांनी यावेळी दिले. या प्रकल्पाबाबत राज्याच्या मुख्यमंत्री



महोदयांना माहिती देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकल्प रचनेचे सादरीकरण तयार करावे, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या सायन्स पार्क आणि तारांगण प्रकल्पाबाबतची माहिती आज महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी सायन्स पार्कला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी दरम्यान घेतली. तसेच शहरात उभारण्यात येणाऱ्या विज्ञान आविष्कार नगरी (सायन्स सिटी) बाबतही त्यांनी माहिती घेऊन विविध सूचना केल्या. खगोल शास्त्राच्या अभ्यासाकरिता शहरामध्ये चिंचवड येथील विज्ञान केंद्र उभारण्यात आले आहे, दरवर्षी सुमारे ३ लाखांवर विद्यार्थी व नागरिक सायन्स पार्कला भेट देत असतात. याठिकाणी तारांगण उभारण्यात आले आहे. विज्ञान विषयक आणि खगोलशास्त्र विषयक माहिती एकाच जागेत विद्यार्थी आणि नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी संपूर्ण भारत देशातील चार तारांगणांपैकी एक असलेल्या तारांगणाची उभारणी महापालिकेने केली आहे. यासोबतच आता शहरामध्ये विज्ञान आविष्कार नगरी (सायन्स सिटी)उभारण्यात येणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी सायन्स पार्क येथे भेट देऊन पाहणी केली.

# धायरी येथील गणेश मंडळांना रात्री 12 पर्यंत परवानगी! - शिंदे!

## धायरी उपनगर परिसरातील गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण

| पुणे | महाईन्यूज |

धायरी उपनगर येथील मंडळांना रात्री १२ पर्यंत स्पीकर्सला परवानगी मिळावी यासाठी येथील कार्यकर्ते प्रयत्नशील होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धायरी उपनगर परिसरातील गणेश मंडळांना ही परवानगी दिल्याने येथील मंडळांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सिंहगड रस्त्यावरील अभिरुची मॉल जवळील संकल्प मित्र मंडळास भेट दिली देवून बाप्पांची आरती केली.

**एकनाथ शिंदे यांनी धायरी उपनगर परिसरातील गणेश मंडळांना ही परवानगी दिल्याने येथील मंडळांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**

यावेळी शिंदे गटाचे शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रमेश बापू कोंडे, खासदार श्रीरंग बारणे, उपशहर प्रमुख निलेश गिरमे, संकल्प प्रतिष्ठानच्या अध्यक्षा राधिका दशरथ गिरमे, आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बुधवारी पुणे जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यात शहरातील गणेशोत्सव मंडळांना भेटी व गणेश दर्शन यांचे नियोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत खडकवासला मतदार संघातील सिंहगड रस्त्यावरील अभिरुची मॉल येथील संकल्प मित्र मंडळास भेट दिली.



### धायरी उपनगरात प्रथमच शिवसेनेचे मुख्यमंत्री दाखल

**नवे सरकार स्थापन झाल्यानंतर खडकवासला मतदार संघातील मोजक्याच कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्यापैकी एक असणारे उपशहर प्रमुख निलेश गिरमे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बाप्पाच्या दर्शनासाठी आमंत्रित केले होते. शिंदे यांनी ही विनंतीला मान देत, संकल्प मित्र मंडळास भेट दिली. कोणताही शिवसेना पक्षाचा मुख्यमंत्री धायरी उपनगरमध्ये येण्याची ही पहिलीच वेळ आसल्याने, परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली.**

# पाषाण-सूस सेवा रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्याची चंद्रकांत पाटील यांची सूचना

| पुणे | महाईन्यूज |

सूस खिंडीतील कचरा प्रक्रिया प्रकल्पाची भिंत आत घेऊन वाहतूक कोंडी सोडविण्यात यावी. तसेच सेवा रस्ता जलदगतीने पूर्ण करून पाषाण सूस उड्डाणपुलासाठी अधिग्रहण केलेल्या जागेचा मोबदला तातडीने देण्यात यावा, अशी सूचना राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री, कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. पाषाण -सूस मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या सूस खिंड उड्डाणपुलाची पाहणी चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी केली. या कामाचा आढावाही त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतला. तसेच स्थानिक नागरिकांच्या अडचणींची माहिती घेतली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, राजेंद्र मुठे, वाहतूक शाखेचे श्रीनिवास बोनाला, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, शहर प्रवक्ता संदीप खर्डेकर, माजी नगरसेवक अमोल बालवडकर, ज्योती कळमकर यांच्यासह



भाजपचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पाषाण -सूस मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेच्या वतीने सूस खिंड उड्डाणपुलाची उभारणी करण्यात येत असून, या उड्डाणपुलाचे काम पूर्णत्वास येत असले, तरी सेवा रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण आहे. त्यासोबतच सूस भागातील कचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या भिंतीमुळे वाहतूक कोंडी होत आहे.

चंद्रकांत पाटील यांनी नागरिकांच्या अडचणी तातडीने करण्याची सूचना महापालिका अधिकाऱ्यांना केली. प्रामुख्याने सेवा रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणे, कचरा प्रक्रिया प्रकल्पाची भिंत मागे घेऊन रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडवणे, त्याचप्रमाणे उड्डाणपुलासाठी अधिग्रहित केलेल्या जमीन मालकांना त्याचा मोबदला तातडीने देण्याची सूचना पाटील यांनी केली.

# यंदाचा गणेशोत्सव ‘आवाजी’; सरासरी ध्वनिपातळी ८० ते ९० डेसिबलवर

## उत्सव आवाजी झाल्याचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तंत्रशास्त्र विद्यापीठाद्वारे पाहणी

| पुणे | महाईन्यूज |

गेली दोन वर्षे साध्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा झाल्याने यंदाचा उत्सव आवाजी झाल्याचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तंत्रशास्त्र विद्यापीठाने केलेल्या पाहणीतून दिसून आले. गणेशोत्सवातील पहिल्या पाच दिवसांमध्ये शहराच्या विविध भागात ध्वनिपातळी ८० ते ९० डेसिबलवर गेल्याचे असल्याचे आढळून आले. सर्वसाधारण दिवशी ही पातळी ६० डेसिबलपर्यंत पोचते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे तंत्रशास्त्र विद्यापीठातील उत्पादन अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवातील पहिल्या पाच दिवसांमध्ये शहराच्या विविध भागांमध्ये आवाजाच्या शास्त्रीय पद्धतीने नोंदी घेतल्या. त्यात जय टिपरे, नंदन झंवर, सार्थक मोरकर, आर्यमन महाजन, श्री खेडकर, सेजल मेश्राम, प्रत्युषा म्हस्के, रोशनी पाडवे, अपेक्षा शेळके, आयुष जैन, शर्वरी मोराडे, श्रद्धा पाटील, जयवंत नांदोडे यांचा सहभाग होता.मॉडर्न महाविद्यालय, शिंदे पार, उंबऱ्या गणपती, टिळक चौक, गोखले चौक, सूस रस्ता, बालाजी चौक, बाणेर रस्ता, पाषाण, सुतारवाडी, गांजवे चौक, नळस्टॉप, गरवारे महाविद्यालय, आयडियल कॉलनी, आनंद नगर, शिवाजी पुतळा, मनपा भवन, बाजीराव रस्ता, बळीराम चौक, बेलबाग चौक, जंगली महाराज रस्ता, लाल महाल, छावणी परिसर, रविवार पेठ या भागांमध्ये ध्वनिपातळीच्या नोंदी घेण्यात आल्या. वेळेची सूट दिल्यानंतर भक्तांची गर्दी आणि ध्वनि पातळीत वाढ, मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये आवाजी गणेशवंदना झाल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.



**गणेशोत्सवातील पहिल्या पाच दिवसांमध्ये शहराच्या विविध भागात ध्वनिपातळी ८० ते ९० डेसिबलवर गेल्याचे असल्याचे आढळून आले. सर्वसाधारण दिवशी ही पातळी ६० डेसिबलपर्यंत पोचते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे तंत्रशास्त्र विद्यापीठातील उत्पादन अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवातील पहिल्या पाच दिवसांमध्ये शहराच्या विविध भागांमध्ये आवाजाच्या शास्त्रीय पद्धतीने नोंदी घेतल्या.**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे तंत्रशास्त्र विद्यापीठाचे डॉ. महेश शिंदीकर म्हणाले, की सर्व प्रकारचे आवाज मिळून दैनंदिन ध्वनिपातळी सरासरी साठ डेसिबल असते. मात्र गणेशोत्सवाच्या पहिल्या पाच दिवसांमध्ये शहराचा मध्यवर्ती भाग आणि उपनगरांमध्ये ध्वनिपातळी ८० ते ९० डेसिबलवर पोहोचल्याचे निदर्शनास आले.

गेली दोन वर्षे गणेशोत्सव साध्या पद्धतीने झाल्याने यंदा उत्साहाने केलेले देखावे, रोषणाई, गर्दी या सर्वांचा एकत्रित परिणाम ध्वनिपातळी वाढण्यावर झाल्याचे दिसून येते.

# रॅपिडो बाईक वाहतूक बेकायदेशीर!

## बाबा कांबळे यांची टीका : परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे यांच्या सोबत बैठक

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे शहरात रिक्षा मीटरची पहिल्या दीड किलोमीटर साठी 27 रुपये व नंतर प्रत्येक एक किलोमीटरसाठी 18 रुपये भाववाढ करण्याचे ठरवले होते. मात्र नंतर 25 रुपये आणि 17 रुपये अशी मीटरची भाडेवाढ झाली आहे. एक रुपयाने भाडेवाढ कमी केल्यामुळे रिक्षा चालक, मालकांमध्ये नाराजीचा सूर होता. तसेच रिक्षा चालक मालक इतर प्रश्नाबाबत देखील वारंवार तक्रारी करत आहेत. मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात होते. नुकतेच या सर्व प्रश्नांबाबत परिवहन आयुक्तांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये रिक्षा चालकांचे प्रश्न मांडले आहेत. ही बैठक सकारात्मक पार पडली आहे. या मधून रिक्षा चालकांचे प्रश्न मार्गी लागतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी केले.**



परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे यांच्यासोबत पुणे, पिंपरी चिंचवड शहरातील रिक्षा संघटनांची बैठक पार पडली. प्रादेशिक परिवहन अधिकारी अजय शिंदे यांच्या प्रयत्नातून मुंबईत झालेल्या बैठकीत बाबा कांबळे यांनी विविध समस्यांचे गाऱ्हाणे मांडले. या वेळी परिवहन आयुक्तांनी देखील प्रश्न सोडविण्याबाबत सकारात्मकता दाखवली असल्याची माहिती बाबा कांबळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

या बैठकीमध्ये पुणे पिंपरी चिंचवड शहरातील सर्व रिक्षा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या मध्ये महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे संस्थापक अध्यक्ष कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे, पुणे शहराध्यक्ष शफीकभाई पटेल, प्रदेश उपाध्यक्ष आनंद तांबे, पुणे उपाध्यक्ष अर्शद अन्सारी, कार्याध्यक्ष विकास केमसे, शाहरुख सय्यद, आदी या वेळी उपस्थित होते.

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांमध्ये रिक्षा चालक, मालकांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिक बिकट होत आहे. नुकतेच पुणे शहरांमध्ये मीटरची भाव वाढ झाली आहे. पहिल्या दीड किलोमीटरसाठी 25 रुपये व नंतरच्या प्रत्येक किलोमीटरसाठी 17 रुपये भाववाढ देण्यात आली आहे. आधी ठरवले एक आणि नंतर अंमलबजावणी दुसरीच केली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे रिक्षा चालक नाराज झाले आहे. रिक्षा चालकांवर कर्जाचा डोंगर आहे, फायनान्स कंपनीचे हफ्ते द्यायचे आहेत असे असताना रिक्षा भाडेवाढ योग्य प्रमाणात न केल्यामुळे त्याचा नाहक त्रास रिक्षा चालक मालकांना होत आहे. रिक्षा चालकांच्या प्रश्नांवर शासन उदासीन असल्याचे दिसते. रखडलेले प्रश्न सुटावेत यासाठी आंदोलन, मोर्चे, पाठपुरावा केला जात होता. त्याची दखल परिवहन आयुक्तांनी घेतली. त्यानुसार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. या मध्ये बेकायदेशीर असणाऱ्या दुचाकी वाहतुकीला महाराष्ट्रात परवानगी नको अशी मागणी रिक्षा संघटनांनी केल्या. त्याला परवानगी नाही असे सांगण्यात आले. नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे दुचाकी वाहतूक करणाऱ्यावर कारवाई वाढवण्यात येणार आहे. दुचाकी विरोधात आरटीओ विभागाच्या वतीने गुन्हे दाखल करण्याचा निर्णय देखील घेण्यात आल्याचे या बैठकीत सांगितले.

### रिक्षा चालकांच्या प्रश्नांवर चर्चा...

मेट्रो सिटीसह महाराष्ट्र मध्ये सर्वच आरटीओ कार्यालयामध्ये मीटरचे दर ठरवण्याची पद्धत एकच असावी. ओला, उबेर कंपन्यांनी चालकांना पाच लाखाचा विमा दिला पाहिजे. मेट्रो बीआरटीवर धोरण ठरवताना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणून रिक्षाला गृहीत धरावे, अशी मागणी करण्यात आली. रिक्षाला मुक्त परवाना बंद करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा. पुढील कार्यवाही करावी. परंतु इलेक्ट्रिक वाहनांना परवानगीची अट नसल्यामुळे केंद्रात हा कायदा केला. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांना यापुढे परवाना परमिट आवश्यक नाही. रिक्षा चालक मालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. त्याकडे कानाडोळा केला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः या कल्याणकारी मंडळाबद्दल आग्रही आहेत. त्यांनी आरटीओ विभागाशी चर्चा करून हा प्रश्न निकाली निघेल, असे आश्वासन दिले असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. पाटणकर समिती, हकीम समिती नंतर खटवा समितीच्या शिफारशीनुसार भाडेवाढ देण्यात येते. परंतु खटवा समितीमध्ये आपत्कालीन व्यवस्था, कोविडसारखी परिस्थिती व इतर बाबींचा उल्लेख नसल्यामुळे नव्याने समिती स्थापन करण्यात यावी, अशी मागणी रिक्षा संघटनांनी केल्या. या मागण्यांसह रिक्षा चालकांच्या रखडलेल्या अनेक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. अजून बहुतेक मुद्दे मार्गे लागतील, अशी अपेक्षा निर्माण झाली असे महाराष्ट्र पंचायत अध्यक्ष बाबा कांबळे यांनी सांगीतले.

---

# जादा दराने ठेकेदाराला ११ कोटीचे काम?

## प्रशासकीय राजवटीत संशयाचा कारभार, ई-वाहने भाड्याने घेण्यासाठी 19 कोटीचा खर्च

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी आता महापालिकेने अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या वापरासाठी इलेक्ट्रीकल वाहने पाच वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही ई-वाहने भाडेतत्वावर घेण्यासाठी महापालिकेने एकूण १९ कोटी रूपये खर्चाच्या तीन स्वतंत्र निविदा प्रक्रीया राबवल्या. त्यामध्ये अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दर सादर करूनही एका एजन्सीला दोन निविदांचे ११ कोटीचे काम देण्यात येणार आहे.**



बॅटरी इलेक्ट्रीक व्हेईकल धोरण २०२१ अंतर्गत राज्याच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या ८ ऑगस्ट २०२१ रोजीच्या निर्णयानुसार राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ई-वाहन वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. त्याच धर्तीवर पिंपरी -चिंचवड महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त इलेक्ट्रीक वाहन खरेदीसाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे धोरणही महापालिकेने डिसेंबर २०२१ मध्ये आखले आहे. ई-वाहन खरेदी करण्यासाठी दुचाकी आणि मोटारीसाठी वाहनाच्या मुळ किमतीच्या १० टक्के अनुदान कर्मचाऱ्यांना देण्यात येते.

इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी आता महापालिकेने अधिकारी- पदाधिकारी यांच्या वापरासाठी इलेक्ट्रीकल वाहने पाच वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही ई-वाहने भाडेतत्वावर घेण्यासाठी महापालिकेने एकूण १९ कोटी रूपये खर्चाच्या तीन स्वतंत्र निविदा प्रक्रीया राबवल्या. पहिल्या निविदा प्रक्रीयेत टाटा नेक्सॉन इलेक्ट्रीकल वाहने विना वाहनचालक भाडेतत्वावर घेण्यासाठी सात कोटी रूपये खर्च अपेक्षित धरण्यात आला. त्यामध्ये श्री बालाजी गॅरेज यांनी ५३ हजार ८५० रूपये प्रति महिना अमर्याद धावेकरिता इतर ठेकेदारांपेक्षा लघुत्तम दर सादर केला. मात्र, हा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.२ टक्के जादा आहे. तरीही त्यांच्याकडून पाच वर्षे कालावधीकरिता पहिल्यांदा २५ वाहने भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत. त्यानंतर आवश्यकतेनुसार वाहने घेण्यासाठी निविदा रकमेच्या मर्यादेत करारनामा करण्यात येणार आहे. दुसऱ्या निविदा प्रक्रीयेत टाटा टिगोर इलेक्ट्रीकल वाहने विना वाहनचालक भाडेतत्वावर घेण्यासाठी चार कोटी रूपये खर्च अपेक्षित धरण्यात आला. त्यामध्येही श्री बालाजी गॅरेज यांनी ४३ हजार ६४१ रूपये प्रति महिना अमर्याद धाव असा इतर ठेकेदारांपेक्षा लघुत्तम दर सादर केला. मात्र, हा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.३४ टक्के जादा आहे. त्यानुसार, त्यांच्याकडून पाच वर्षे कालावधीकरिता वाहने भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत. तिसऱ्या निविदा प्रक्रीयेत टाटा टिगोर इलेक्ट्रीकल वाहने वाहनचालकांसह भाडेतत्वावर घेण्यासाठी आठ कोटी रूपये खर्च अपेक्षित धरण्यात आला. त्यामध्ये महालक्ष्मी एंटरप्रायजेस यांनी १ हजार ९३९ रूपये प्रति महिना असे सर्वात लघुत्तम दर सादर केले. हा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.८९ टक्के कमी आहे. त्यानुसार, त्यांच्याकडून पाच वर्षे कालावधीकरिता पहिल्यांदा १५ वाहने भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत.

### चार्जिंग स्टेशन उभारणीचा खर्चही करावा लागणार

**या कामांअंतर्गत नेमणूक झालेल्या एजन्सींनी महापालिकेला याच दराने पाच वर्षे कालावधीसाठी वाहने पुरवठा करायची आहेत. तसेच महापालिकेस आवश्यक त्या ठिकाणी इलेक्ट्रीक व्हेईकल चार्जिंग स्टेशन उभारणी करणे आणि वाहने चार्जिंग आणि इन्शुरन्सचा खर्चही करावा लागणार आहे.**

## संपादकीय »

# अस्थिर गलबताच्या कप्तान

***काही दिवसांपूर्वीच सकल राष्ट्रीय उत्पादनात म्हणजे जीडीपीमध्ये भारताने इंग्लंडला मागे टाकून जगात पाचवा क्रमांक मिळविला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग पाहता हे एक दिवस होणारच होते.***

काही दिवसांपूर्वीच सकल राष्ट्रीय उत्पादनात म्हणजे जीडीपीमध्ये भारताने इंग्लंडला मागे टाकून जगात पाचवा क्रमांक मिळविला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग पाहता हे एक दिवस होणारच होते. मात्र, इंग्लंडला मागे टाकण्याला एक विशेष अर्थ होता. ऋषी सुनक हे ब्रिटनच्या नेतृत्वाच्या स्पर्धेत जिंकले असते तर भारतीयांना एक आगळा आनंद झाला असता. तो अर्थातच प्रतीकात्मक ठरणारा असता. मात्र, एक भारतीय वंशाचा नेता आणि 'इन्फोसिस'चे संस्थापक नारायण मूर्ती यांचा जावई हा भारतावर दीडशे वर्षे राज्य केलेल्या ब्रिटनचा पंतप्रधान होऊ शकतो, यात एक 'काव्यगत न्याया'ची शक्यता होती. त्यामुळेच, ब्रिटनमधील ऋषी सुनक आणि लिझ ट्रस यांच्या अंतिम फेरीकडे भारतीयांचे एरवीपेक्षा जास्तच लक्ष होते. ऋषी सुनक यांनी प्रचाराच्या पहिल्या फेऱ्यांमध्ये चांगली मजल मारली. मात्र, गेल्या दोन आठवड्यांमध्ये पारडे फिरू लागल्याचे दिसत होते. स्वत: सुनक यांनाही त्याचा अंदाज आला होता. गेल्या काही वर्षांत ब्रिटनमध्ये वेगाने सत्तांतरे होत आहेत आणि पुढे-मागे ऋषी सुनक यांच्यासाठी '१० डाउनिंग स्ट्रीट' या पंतप्रधान निवासाचा दरवाजा उघडूही शकतो. ब्रिटनची राज्यव्यवस्था आपण घेतली असली तरी ती पुष्कळ बदलली. तिला अनेक ग्रहणेही लागली. ब्रिटनमध्ये मात्र 'पक्षाचे सारे सदस्य मतदान करणार, आपल्या पक्षाचा नेता निवडणार आणि तो नेता सरकार स्थापनेचा दावा करणार' ही व्यवस्था चांगली रुळली आहे. अनेक इच्छुकांमधून नेमके स्पर्धक पुढे येतात. मग मतदान होते. यामुळेच, या निवडीला बराच कालावधी जातो. हुजूर पक्षाच्या एक लाख ७२ हजारांहून अधिक सदस्यांनी मतदान केले. या निर्णायक मतदानात सुनक यांचे 'अश्वेत' असणे, हा कळीचा मुद्दा ठरला का, यावर सध्या ब्रिटनमध्ये चर्चा चालू आहे. हुजूर पक्षाचे ज्येष्ठ सदस्य लिझ ट्रस यांचे समर्थक आणि तरुणांचा ओढा ऋषी सुनक यांच्याकडे, असे चित्र साकारत गेले. शेवटी, आजवरचे अतिशय कमी मताधिक्य मिळवून लिझ ट्रस जिंकल्या आहेत.लिझ ट्रस या ब्रिटनच्या तिसऱ्या महिला पंतप्रधान आहेत. त्यांच्यासमोर लहानपणी शाळेत भूमिका केलेल्या 'पोलादी पंतप्रधान' मागरिट थॅचर यांचा आदर्श असला तरी त्यांच्यापुढची आव्हाने कमालीची अवघड आहेत. ब्रिटन ही कागदावर जगातली सहावी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असली तरी आज सारा देश अशांत आहे. महागाईने उच्चांक गाठला आहे.

# कोर्टात निकाल दिले जातात की निकाल लावले जातात?




सुप्रीम कोर्टात व एकूणच ट्रायल, हायर कोर्टात केसेस बोर्डावर घेण्याचे आणि सुनावणी तारीख निश्चित करण्याची काही नेमकी घटनात्मक कार्यपद्धती अजून तरी नाही. आता काही ऑटो सिस्टीम आहेत, पण रोस्टर मास्टर अधिकार कायमच आहेत. त्यामुळे वारंवार याबाबत प्रश्न उपस्थित केले जातात. दीपक मिश्रा सरन्यायाधीश असताना त्यांच्यावर चार ज्येष्ठ न्यायाधीशांनी केलेले गंभीर आरोप आठवताहेत का? हे आरोप प्रशासकीय कार्यशैली, रोस्टर, तारखा देणे, महत्त्वाच्या केसेसला ठराविकच न्यायाधीश देणे याबाबत होते.आज शिंदेंना पुढची 27 सप्टेंबर तारीख मिळाली असली तरी, मुंबई पालिका पोटनिवडणूक पुढे आहे. दसरा 5 ऑक्टोबर रोजी आहे शिंदेंना त्या आत रिलीफ मिळाला तर हवा आहे. त्यासाठी त्यांची धडपड राहील. महाराष्ट्रातील आजवरच्या एकत्रित सर्व मुख्यमंत्र्यांनी घेतले नसतील एव्हढे गणपती दर्शन त्यांनी घेतले आहे. शिंदेंना गणपती बाप्पा प्रसन्न झाल्याशिवाय राहणार नाही. गणपतीच्या कानात काही मागणे सांगितले की सर्व इच्छा पूर्ण होतात म्हणे. शिंदेंना हा शॉर्ट कट सापडला आहे. मिळेल त्या गणपतीच्या कानात सांगून ते महाराष्ट्र समस्यामुक्त करून सोडतील, सर्व जनतेच्या सर्व इच्छा पूर्ण करून सोडतील.

### महाराष्ट्राच्या संदर्भात ताजी क्रोनालॉजी समजून घ्या -

1. शिवसेनेच्या अनेक केसेस पेंडिग आहेत, तारखांवर तारीख अन् सुनावणी लांबतेय.

2. शिवसेनेतून फुटून बाहेर पडलेले व भाजपाच्या साथीने सत्तेत आलेले एकनाथ शिंदे यांच्या फुटीर गटाला रिलीफ हवाय, त्यासाठी याचिका दाखल केली जाते आणि त्यावर तात्काळ, रात्रीतूनच निर्णय होऊन खंडपीठ गठित होते, आता सुनावणीही जलद होईल, अशी आशा आहे.

• आज पुढची 27 सप्टेंबर तारीख दिली गेली असली तरी पुढे निकालही लवकरच दिला जाऊ शकेल. निकाल लागेल; पण नेमका कुणाला न्याय मिळेल की नाही, ते सांगता येणे कठीण आहे.

• सध्याच्या नव्या सुनावणीत सरन्यायाधीश लळीत हे स्वतः घटनापीठात



नाहीत. ते स्वतः महाराष्ट्रातील आहेत. महाराष्ट्रासंबंधी सुणावणीपासून ते सध्या तरी चार हात लांब राहिले, हे तूर्तास ठीक वाटतेय. त्यांच्यावर त्यामुळे पुढे जाऊन पक्षपातीपणाचे आरोप होणार नाहीत. मात्र, भविष्यात वारंवार असे सत्त्वपरीक्षेचे क्षण येणार आहेत. देशाची न्यायव्यवस्था सांभाळण्याच्या सर्वोच्च भूमिकेत असा अलिप्तपणा दाखवून कसे चालेल? महाराष्ट्राच्या भूमीला न्यायदानात रामशास्त्री परंपरेचा इतिहास आहे. देशातील उर्वरित स्तंभाची विश्र्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात आहेत. न्यायव्यवस्थेवरही अलीकडे वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातात. अशा सध्याच्या स्थितीत सरन्यायाआधीश लळीत यांनी अलिप्त राहण्याऐवजी "मास्टर ऑफ दी कोर्ट्स रोस्टर" म्हणून रामशास्त्री बाणा दाखवून द्यायला हवा.

दीपक मिश्रा प्रकरणाने भारतीय न्यायव्यवस्था डागाळली गेली आहे. कोर्टाच्या व्यवस्थेत सारे काही आलबेल नक्कीच नाही. लोअर कोर्टाबाबत फार काही बोलण्यासारखी स्थिती नाही. मात्र, अलीकडे वारंवार हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट हे संशयाच्या गर्तेत सापडलेले दिसतात. उलट अनेक प्रकरणात ट्रायल कोर्ट आता नव्या पिढीतील चांगल्या न्यायाधीशांच्या हाती उत्तम काम करतांना दिसताहेत. मात्र, बड्या मंडळींना ट्रायल टाळून थेट हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात जाण्यात धन्यता वाटते. त्यात कधी वेळकाढूपणा तर कधी तात्काळ रिलीफ मिळविण्याचा हेतू असतो. उठसूठ हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात धाव घेण्याच्या वाढत्या प्रवृत्तीलाही सरन्यायाधीश लळीत यांनी पायबंद घालायला हवा. तसे झाल्यास वरच्या कोर्टावरील अनावश्यक भार कमी होईल. हायर व ट्रायल कोर्टांना गतिमान केल्यास वर्षानुवर्षे महाराष्ट्रातील या रामशास्त्रीला स्मरणात ठेवले जाईल.

### न्यायमूर्ती लोया प्रकरणाचा डाग

भारतीय न्यायव्यवस्थेच्या प्रतिमेवर न्यायमूर्ती ब्रिजगोपाल लोया प्रकरणाने कायम एक प्रश्नचिन्ह निर्माण करून ठेवल्याचे अनेकांचे मत आहे. भाजपचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि सध्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आरोपी असलेल्या सोहराबुद्दीन चकमक प्रकरणाची सीबीआयच्या विशेष न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून लोया सुनावणी करीत होते. लोकशाहीच्या रक्षणासाठी त्यांच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी गरजेची असल्याचे सांगणाऱ्या याचिकेचा दीपक मिश्रा यांच्या काळातच निकाल लावला गेला.

# तरच शिक्षणसंस्थांचे संचालक जागे होतील?

**नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण यशस्वी व्हायचे असेल तर शिक्षणसंस्था चालविणाऱ्या संचालकांनी पुढाकार घेऊन स्वागतशील व्हावे लागेल. बदल करावे लागतील**

भविष्यवेधी दृष्टी ठेवावी लागेल. हे खरेच होईल का? केंद्र सरकारच्या संस्थांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून याचे नियोजन सुरू आहे. राज्य सरकारच्या अखत्यारीतली विद्यापीठे तसेच संलग्न महाविद्यालये यात मात्र म्हणावे तसे नियोजन नाही. दोन सप्टेंबर २०२२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांमुळे आता राज्यस्तरावर या विषयाला गती येईल.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये अभ्यासक्रमांतील बदलांबरोबरच शैक्षणिक संस्थांमध्ये रचनात्मक बदलही अपेक्षित आहेत. सन २०३५ पर्यंत विद्यापीठांना संलग्नित महाविद्यालये ही रचना कालबाह्य होणार आहे. प्रत्येक महाविद्यालय हे पदवी प्रदान करणारे बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्था असेल. सर्व महाविद्यालये अशी स्वायत्त होण्यासाठी कालबद्ध योजना हवी. पदवी प्रदात्या बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्थेचा दर्जा मिळवण्यासाठी चांगले नॅक मानांकन मिळवून स्वायत्त महाविद्यालयांचा दर्जा प्राप्त करणे किंवा अन्य संस्थांशी सहयोग करून



समूह तयार करणे किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय बनणे हे पर्याय आहेत.

आजचे महाविद्यालयीन शिक्षण हे बंदिस्त तसेच खंडित आहे. यामध्ये एका विद्याशाखेत शिकताना अन्य विद्याशाखेतील विषय शिकण्याची सोय नाही. पारंपारिक उच्च शिक्षणात व्यावसायिक तसेच व्यवसाय (व्होकेशनल) शिक्षणाचा अंतर्भाव व्हावा, ही बहुविद्याशाखीय शिक्षणात अंतर्भूत कल्पना आहे. यामध्ये भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान, भारतीयत्व, कला, नृत्य, नाटक, शिक्षणशास्त्र, गणित, संख्याशास्त्र, मूलभूत व उपयोजित विज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, खेळ, भाषांतर अशा विषयांचे विभाग बहुविद्याशाखीय संस्थेत असावेत ही कल्पना आहे. केवळ एखाद्या विषयाचे (उदा. शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, विधी वगैरे) महाविद्यालय या संकल्पनेतून बाहेर येऊन सर्व विद्याशाखेतील विविध विषय विद्यार्थ्यांना अभ्यासता येतील, अशी कल्पना नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात आहे. भारतामध्ये उच्च शिक्षण संस्थांमध्ये अनेक प्रकार आहेत. यात आयआयटी, एनआयटी, आयआयएम अशा कायद्याने स्थापित व अनुदानित संस्था आहेत. तसेच, केंद्रीय विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे, खाजगी व अनुदानित अभिमत विद्यापीठे, राज्यस्तरीय सार्वजनिक विद्यापीठे आहेत. महाविद्यालयांतही शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित असे प्रकार आहेत.

यामधील बऱ्याच शैक्षणिक संस्था एकात्मिक पद्धतीच्या (एकाच विद्याशाखेचे) शिक्षण देतात. त्यामुळे केंद्र सरकारच्या संस्थांपासून ते तालुक्यातील एखाद्या महाविद्यालयांपर्यंत सर्वांना बहुविद्याशाखीय शिक्षणसंस्थेत परिवर्तीत करताना अनेक रचनात्मक बदल करावे लागतील. केंद्र सरकारच्या संस्थांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून याचे नियोजन सुरू आहे.

## ।। अभंगवाणी ।।




स्मशान ते भूमि प्रेतरूप जन ।
सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥१॥
भरतील पोट श्वानाचिया परी ।
वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### पेट्रोल-डिझेलच्या दरातील चढ-उतार कायम



।मुंबई। महाईन्यूज।

महाराष्ट्रातील पेट्रोलच्या किमती डायनॅमिक इंधन किंमत प्रणालीवर आधारित आहेत आणि त्यामुळे नियमितपणे सुधारित केल्या जातात. दररोज सकाळी ६ वाजता पेट्रोलचे दर सुधारले जातात. अनेक घटक पेट्रोलची किंमत ठरवतात. जसे की रुपया ते अमेरिकन डॉलर विनिमय दर, कच्च्या तेलाची किंमत, जागतिक संकेत, इंधनाची मागणी, इतर. जेव्हा आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती वाढतात तेव्हा भारतात इंधनाच्या किमती वाढतात. तुम्ही तुमच्या शहरातील पेट्रोल आणि डिझेलचे रोजचे दर एसएमएसद्वारे देखील जणून घेऊ शकता. इंडियन ऑइल (IOC) ग्राहक RSP<डीलर कोड> ९२२४९९२२४९ या क्रमांकावर पाठवू शकतात आणि HPCL (HPCL) ग्राहक ९२२२२०११२२ या क्रमांकावर HPPRICE <डीलर कोड> पाठवू शकतात.

# बारामती हे पण महाराष्ट्रातच..!

## देवेंद्र फडणवीसांचा ‘मिशन बारामती’वरून शरद पवारांना टोला

।मुंबई।महाईन्यूज।

आगामी निवडणुकींसाठी राज्यात भाजपाकडून मोर्चेबांधणी करण्यात येते आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपाने ‘मिशन महाराष्ट्र’ असा नारा दिला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पुणे दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी राष्ट्रवादीचा गड मानल्या जाणाऱ्या बारामतीबाबत भाष्य केले आहे. “आमचे मिशन इंडिया, मिशन महाराष्ट्र सुरू आहे. बारामती हे महाराष्ट्रातच येते.

त्यामुळे मिशन महाराष्ट्रात बारामती देखील आहे” असा टोला फडणवीसांनी पवारांना लगावला आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे तिनदा निवडून आल्या



**भाजपाने ‘मिशन महाराष्ट्र’ असा नारा दिला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पुणे दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी राष्ट्रवादीचा गड मानल्या जाणाऱ्या बारामतीबाबत भाष्य केले आहे. “आमचे मिशन इंडिया, मिशन महाराष्ट्र सुरू आहे. बारामती हे महाराष्ट्रातच येते. त्यामुळे मिशन महाराष्ट्रात बारामती देखील आहे” असा टोला फडणवीसांनी पवारांना लगावला आहे.**

आहेत. बारामती लोकसभेचा गड उद्ध्वस्त करू, असे वक्तव्य काही दिवसांपूर्वी बारामती दौऱ्यावर असताना भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर आता फडणवीसांनीही भाजपाचे मनसुबे बोलून दाखवले आहेत.

दरम्यान, भाजपा नेत्यांच्या या वक्तव्यावर राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. एखाद्याचा अश्वमेध रोखल्यावर जो त्रास होतो, तो त्रास शरद पवारांच्या बारामतीत भाजपाला होत आहे, असा टोला पाटलांनी भाजपाला लगावला आहे. बारामतीत सूर्य एखाद्यावेळी पश्चिमेकडे उगवेल, परंतु बारामती पवारांना सोडणार नाही एवढं ते घट्ट नातं आहे,” असेही जयंत पाटील म्हणाले आहेत.

राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील चंद्रशेखर बावनकुळेंच्या या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. “बावन कुळे सोडा, लाख कुळे आली तरी शरद पवारांच्या पायाच्या नखावरची धूळसुद्धा उडणार नाही” असे विधान आव्हाड यांनी केले आहे.

# ' शाहांच्या ‘जमीनी दाखवण्याची वेळ आलीय’!

## “ती जमीनी दाखवल्यानंतर...”; दोन शब्दांत शिंदे गटालाही टोला

।मुंबई।महाईन्यूज।

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर कठोर शब्दांमध्ये टीका करताना “त्यांना जमीन दाखवण्याची वेळ आली आहे” असं विधान केलं. या विधानावर आता उद्धव ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली असून भाजपाला साथ देणाऱ्या एकनाथ शिंदे गटातील आमदारांचाही अगदी दोन शब्दांमध्ये समाचार या विषयावर भाष्य करताना घेतला आहे. “भाजपा आणि जनतेला दगा देणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला आगामी निवडणुकांमध्ये भुईसपाट करा. धोका देणाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे”, अशी भूमिका घेत शाह यांनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केले.**

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेशी युती



करून भाजपा आगामी निवडणुका लढवणार असून, मुंबईसह महाराष्ट्रात भाजपाचे वर्चस्व आणि सत्ता राहील, याद्दष्टीने तयारी करण्याचे आदेश शहा यांनी दिले. याच भाषणाला संदर्भ उद्धव यांनी मातोश्रीवर काही मोजक्या शिवसेना आमदार आणि खासदारांच्या उपस्थित पार पडलेल्या बैठकीत दिला. आपला दोन दिवसांचा मुंबई दौरा आटपून दिल्लीला परतलेल्या शाह यांनी सोमवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी भाजपाच्या मुंबईतील खासदार-आमदार, पदाधिकारी, माजी नगरसेवकांची बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी सर्वांनी सज्ज राहून, भाजप-शिंदे गटाच्या विजयासाठी आणि भाजपच्या वर्चस्वासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांने सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांना केले. “राजकारणात सारे काही सोसले, तरी दगाबाजी सहन करू नका. जे दगा देतात, त्यांना योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे. मुंबईतील राजकारणात भाजपाचे वर्चस्व दाखविण्याची आणि उद्धव ठाकरे यांना त्यांची जागा दाखविण्याची वेळ आली आहे”, असे शाह यावेळी म्हणाले. शाह यांनी या भेटीदरम्यान लालबागच्या राजाचं दर्शनही घेतलं. याचाच संदर्भ देत उद्धव यांनी टोला लगावला आहे. “काल मंगलमूर्ती आणि अमंगलमूर्ती दोन्ही बघितल्या आपण. ते मंगलमूर्तीच्या दर्शनाला आले होते. ती मंगलमूर्ती आहे तिथे अभद्र काही बोलू नये पण ते बोलून गेले,” असा टोला उद्धव यांनी अमित शाह यांचा थेट उल्लेख न करता लगावला. तसेच पुढे बोलताना उद्धव यांनी, “गणपतीच्या मंडळामध्ये सुद्धा त्यांना राजकारण दिसलं त्याला आपण काही करु शकत नाही,” असंही म्हटलं. “मी एवढं सांगेन की गणपती हा बुद्धीदाता आहे. सर्वांना त्याने सुबुद्धी द्यावी हीच माझी गणरायाकडे प्रार्थना आहे,” अशी खोचक प्रतिक्रिया उद्धव यांनी दिली.

**शिंदे गटाचा अप्रत्यक्षपणे ‘नासलेली लोक’ असा उल्लेख उद्धव ठाकरेंनी केला. “भास्करराव, रविंद्र वायकर, अनिल परब, सुनिल प्रभू आणि इतर आमदाराही इथे आहेत. या आमदारांना ते लालूच दाखवून नेऊ शकत होते. का नाही नेऊ शकले? कारण शेवटी निष्ठा हा असा विषय असतो की तो कोणी कितीही बोली लावली तरी तो विकला जाऊ शकत नाही आणि कोणी विकतही घेऊ शकत नाही. त्यामुळे हे सर्व निष्ठावान सोबत राहिले. बाळासाहेब सांगायचे तसेच नासलेली लोक असण्यापेक्षा मूठभर का असेना निष्ठावान असले तरी मैदान निघतं सगळं,” असं उद्धव म्हणाले.**

“काल ते येऊन बोलून गेले की शिवसेनेला जमीन दाखवायची. दाखवा. ती जमीन दाखवल्यानंतर त्यावर काय बोलायचं ते बोलू. थोडक्यात सांगायचं तर आता संघर्षाचा काळ आहे. शिवसेना ते संपवायला निघालेले आहेत. या संघर्षाच्या काळात जो सोबत राहतो तो आपला,” असंही उद्धव यांनी आमदारांसोबतच्या या खासगी बैठकीमध्ये म्हटलं.

यानंतर उद्धव ठाकरेंनी उपस्थित आमदारांचा उल्लेख करत त्यांनी निष्ठा विकली नाही असं म्हटलं. त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे गटातील ४० फुटीर आमदारांवर टीका करताना उद्धव यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या वाक्याचा संदर्भ दिला.

## शॉर्ट न्यूज »

### विरोधी पक्षाचा एकही नेता भाजपाला घाबरणार नाही



।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेला कन्याकुमारी येथून सुरुवात झाली आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन, छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी राहुल गांधींच्या हाती तिरंगा ध्वज सोपवल्यानंतर ही यात्रा सुरुवात झाली.यावेळी राहुल गांधी यांना आपल्या भाषणातून भाजपावर जोरदार टीका केली, ते म्हणाले, "या सुंदर ठिकाणाहून भारत जोडो यात्रा सुरू करताना मला खूप आनंद होत आहे. राष्ट्रध्वज हा या देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा धर्म आणि भाषा दर्शवतो. मात्र त्यांना (भाजपा आणि आरएसएस) वाटते की हा झेंडा त्यांची वैयक्तिक मालमत्ता आहे."

# धनुष्यबाण कोणाचं, शिंदे की ठाकरे?

## निवडणूक आयोगातील प्रकरणात SC कडून पुढची तारीख

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'निवडणूक चिन्हासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगासमोरील सुनावणीला स्थगिती देऊ नये', असा अर्ज मंगळवारी (६ सप्टेंबर) शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केला. त्यावर, आज (७ सप्टेंबर) न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठासमोर तातडीने सुनावणी घेण्यात आली. या घटनापीठाने या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली आहे. यावर आता २७ सप्टेंबरला सुनावणी होऊन निर्णय येणार आहे.

निवडणूक आयोगाने शिवसेनेच्या पक्षचिन्हाबाबत निर्णय न घेण्याचे लेखी आदेश दिले आहेत का अशी विचारणा घटनापीठाने सुनावणीत केली. याशिवाय दोन्ही पक्षांची बाजू समजून घेतली. यानंतर घटनापीठाने २७ सप्टेंबरला या प्रकरणी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून निर्णय देऊ, असं स्पष्ट केलं. तसेच निवडणूक आयोगाला २७ सप्टेंबरपर्यंत या प्रकरणात कोणताही निर्णय घेऊ नये,



असे निर्देश दिले. दरम्यान, याआधी शिंदे गटाने शिवसेना पक्षावर आणि पक्षाचं निवडणूक चिन्ह धनुष्यबाणावर आपला हक्क असल्याचा दावा करत निवडणूक आयोगाकडे त्यासाठी अर्ज केला होता. याला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान देत या प्रकरणी निवडणूक आयोगाला निर्णय घेण्यापासून रोखावं अशी मागणी केली होती. या सुनावणीनंतर आता निवडणूक आयोग या प्रकरणात निर्णय घेऊ शकणार की नाही हे २७ सप्टेंबरलाच स्पष्ट होणार आहे.शिंदे गटातील १६ आमदारांच्या अपात्रतेपासून निवडणूक आयोगाच्या सुनावणीपर्यंत अनेक मुद्द्यांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. राज्यातील सत्तासंघर्षासंदर्भातील अखेरची सुनावणी २३ ऑगस्ट रोजी झाली होती. निवृत्त सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी या प्रकरणावर सखोल युक्तिवादासाठी पाच सदस्यीय घटनापीठ स्थापन करण्याचा निर्णय दिला होता. मात्र, प्रत्यक्षात घटनापीठ अस्तित्वात यायला बराच उशीर झाला. शिंदे गटाच्या अर्जानंतर वेगाने हालचाली झाल्या सरन्यायाधीश लळित यांच्यासमोर घटनापीठ स्थापन करण्यासंदर्भातील महत्त्वाचा निर्णय झाला.

शिंदे गटाने मंगळवारी केलेला अर्ज दाखल करून घेताना लळित यांनी, 'निवडणूक आयोगाच्या सुनावणीबाबत लगेचच काही भाष्य करता येणार नाही. पण, बुधवारपर्यंत निर्णय घेतला जाईल', असे स्पष्ट केले होते. त्यामुळे निवडणूक आयोगापुढील सुनावणी सुरू राहणार की नाही, यावर न्यायालय आदेश देण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाची सुनावणी कायम राहिली तर शिवसेनेच्या निवडणूक चिन्हावरील हक्काचा निर्णय न्यायालयाऐवजी आयोगाच्या कक्षेत होऊ शकेल. निवडणूक आयोगाने शिंदे गट आणि शिवसेनेच्या उद्धव गटाला कागदपत्रे सादर करण्यास सांगितले होते. यासंदर्भात आयोगाने शिवसेनेला २३ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे. शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असले तरी, 'मूळ शिवसेना आमचीच' असल्याचा दावा करत शिंदे गटाने 'धनुष्यबाण' या शिवसेनेच्या निवडणूक चिन्हावर हक्क सांगितला आहे. त्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाकडे अर्जही केला आहे. पण, निवडणूक आयोगाने कोणताही निर्णय देऊ नये, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते.

### पालिका निवडणुकांसाठी धडपड

मुंबईसह अन्य महापालिकांच्या निवडणुकीत विजय मिळवून शिवसेनेला शह देण्याचे शिंदे गट- भाजप युती सरकारचे लक्ष्य आहे मुंबई महापालिकेची निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता असल्याचा मुद्दा शिंदे गटाने न्यायालयापुढील अर्जात उपस्थित केला आहे. शिवाय, अंधेरी पूर्व या विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे आमदार रमेश लटके यांच्या निधनामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. पालिका व पोटनिवडणूक लढवण्यासाठी निवडणूक चिन्ह महत्त्वाचे असल्याने याबाबत तातडीने निकाल लागणे गरजेचे असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. शिवसेनेवरील दावेदारीचे प्रकरण प्रलंबित असल्याने राज्यातील पालिका निवडणुकांमध्ये निवडणूक चिन्हासंदर्भात पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात अर्ज करून निवडणूक आयोगासमोरील सुनावणीला स्थगिती न देण्याची विनंती केली आहे.

# आयकर विभागाचे महाराष्ट्रासह देशभरात छापे

## राजकीय पक्षांच्या 'फंडिंग'प्रकरणी झाडाझडती

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयकर विभागाने मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांच्या फंडिंग प्रकरणी महाराष्ट्रासह देशभरात छापेमारी केली आहे. यात दिल्ली, हरियाणा आणि गुजरातचाही समावेश आहे. दिल्लीत टॉप थिंक टँक, सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च (CPR) या संस्थांवर छापे टाकण्यात आले. आयकर विभागाने नोंदणी असलेल्या मात्र मान्यता न मिळालेल्या २० पेक्षा अधिक राजकीय पक्षांच्या फंडिंग प्रकरणी ही कारवाई केली आहे.




**आयकर विभागाने देशभरात जवळपास ११० ठिकाणांवर छापे टाकले आहेत. यात महाराष्ट्रासह दिल्ली, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, हरियाणा आणि इतर काही राज्यांचा समावेश आहे. या कारवाईत आयकर विभागाने पोलीस विभागाचीही मदत घेतली आहे. नोंदणी असलेल्या आणि मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांना मिळालेल्या निधीबाबत आयकर विभाग ठिकठिकाणी छापेमारी करत आहे. यात या पक्षांशी संबंधित प्रमोटर्स आणि संस्थांच्या प्रमुखांचं उत्पन्न आणि खर्च याचेही तपशील तपासले जाणार आहेत.**

आयकर विभागाने देशभरात जवळपास ११० ठिकाणांवर छापे टाकले आहेत. यात महाराष्ट्रासह दिल्ली, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, हरियाणा आणि इतर काही राज्यांचा समावेश आहे. या कारवाईत आयकर विभागाने पोलीस विभागाचीही मदत घेतली आहे. नोंदणी असलेल्या आणि मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांना मिळालेल्या निधीबाबत आयकर विभाग ठिकठिकाणी छापेमारी करत आहे. यात या पक्षांशी संबंधित प्रमोटर्स आणि संस्थांच्या प्रमुखांचं उत्पन्न आणि खर्च याचेही तपशील तपासले जाणार आहेत.

निवडणूक आयोगाच्या तक्रारीवरून ही कारवाई झाल्याचं बोललं जात आहे. आयोगाने राजकीय पक्षांना फंडिंग करणाऱ्या जवळपास १९८ संस्थांची यादी तयार केली होती. या संस्थांनी दिलेल्या पत्त्यावर त्या संस्थांची कार्यालयं आढळलेली नाहीत. यानंतर पोल पॅनलने अशा २,१०० संस्थांवर कारवाईला सुरुवात केली. त्यांच्यावर निवडणूक आयोगाच्या कायद्यांचं आणि नियमांचं उल्लंघन केल्याचा ठपका ठेवण्यात आला. तसेच या संस्थांनी आपला पत्ता आणि संचालकांची नावं अपडेट केली नसल्याचंही आयोगाने म्हटलं आहे.

या सर्व संस्थांना निवडणूक आयोगाने पत्र व्यवहार केला. मात्र, ही पत्रे संबंधित संस्थांना पोहचली नाही. विविध राज्यांच्या निवडणूक आयोगाकडून पोल पॅनलला अशा संस्थांबाबत तक्रारी आल्यानंतर आयकर विभागाकडे त्यांच्यावर कारवाई सुरू झाली.

## देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते होणार मॉस्कोतील लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या पुतळ्याचं अनावरण

। बंगळुरु ।महाईन्यूज ।

लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या कार्याचा रशियात गौरव होणार आहे. मॉस्को येथे अण्णा भाऊंचा पुतळा उभारण्यात आला असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुतळ्याचं १४ सप्टेंबर रोजी अनावरण होणार आहे. या कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे देखील उपस्थित असणार आहेत. अण्णा भाऊंनी रशियाविषयी लिखाण केले आहे. त्यांनी लिहिलेला 'स्टालिनग्राडचा पोवाडा' लोकप्रिय आहे. याशिवाय, त्यांच्या अनेक कथा – कादंबऱ्या रशियन भाषेत भाषांतरित करण्यात आल्या आहेत. आपल्या साहित्याच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांनी रशियन जनतेच्या मनातही आदराचे स्थान मिळवले आहे.



साहित्याच्या माध्यमातून त्यांनी केलेले सीमोल्लंघन लक्षात घेत आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने रशियात मॉस्को येथील 'रुडमिनो मागरिटा फॉरेन लँग्वेज स्टडी' या संस्थेच्या प्रांगणात अण्णाभाऊ साठे यांचा अर्धाकृती पुतळा बसवण्यात आला आहे. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली. फडणवीस म्हणाले, "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा मॉस्कोच्या शासकीय वाचनालयात उभारला जात आहे, ही अतिशय गौरवाची आणि प्रेरणादायी बाब आहे.

# प्रेक्षकांना ठेका धरायला लावणाऱ्या 'चांद माथ्यावरी' या गाण्याची सर्वत्र रंगली चर्चा...



पुणे: बॉईज सिरीजने प्रेक्षकांना जणू वेडच लावले आहे. 'बॉईज ३' चित्रपटाची अख्खा महाराष्ट्र वाट पाहत आहे. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात एक मनोरंजनाचा डोस घेऊन पुन्हा एकदा आलीय 'बॉईज ३'ची टीम. 'मनात शिरली', 'मस्त मौला', 'लग्नाळू २.०' ह्या धमाल गाण्यांनंतर आता नुकतेच 'चांद माथ्यावरी' हे प्रमोशनल गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. अवधूत गुप्तेनी महाराष्ट्राला आणि मराठी चित्रपटसृष्टीला एकापेक्षा एक अशी दर्जेदार गाणी दिलेली आहेत. त्यांची गाणी वाजली की टाळ्या, शिट्ट्या वाजल्याच पाहिजे. असाच एक ठेका धरायला लावणार 'चांद माथ्यावरी' हे गाणं प्रदर्शित झाले असून हे गाणं प्रेक्षकांच्या पसंतीला उतरले आहे. जितेंद्र जोशी यांनी शब्दबद्ध केलेल्या या गाण्याला अवधूत गुप्ते यांचा रांगडा आवाज आणि संगीत लाभलेलं आहे. कमाल अश्या हुकस्टेप असणाऱ्या या गाण्याचे नृत्यदिग्दर्शन राहुल ठोंबरे आणि संजीव हौलदार यांनी केलेले आहे. सर्व सोशल मिडियावर या गाण्याची चलती पाहायला मिळत आहे.

# "स्वत:ला वेळ..." ऋता दुर्गुळने सांगितलं नाटकासह छोट्या पडद्यावरुन ब्रेक घेण्यामागचे कारण

छोट्या पडद्यावरील 'फुलपाखरु' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री म्हणून ऋता दुर्गुळेला ओळखलं जाते. ऋताने 'फुलपाखरु' या मालिकेतून प्रेक्षकांची मने जिंकली. ती नेहमीच काही ना काही कारणामुळे चर्चेत असते. मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक अशी तिची ओळख आहे.'अनन्या', 'टाईमपास ३' या दोन्ही चित्रपटांमुळे ती अजूनही प्रसिद्धीझोतात आहे. काही दिवसांपूर्वी तिची प्रमुख भूमिका असलेली मन उडू उडू झालं या मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. यानंतर तिच्यावर अनेकदा टीका होताना पाहायला मिळते. मात्र नुकतंच तिने या सर्व टीकांवर स्पष्टीकरण दिलं आहे. ऋता दुर्गुळने नुकतंच एका प्रसिद्ध वृत्तपत्राला मुलाखत दिली. यावेळी तिने मालिका तसेच नाटकातून ब्रेक घेण्यामागचे कारण सांगितलं आहे. तसेच सलग दोन चित्रपट एकत्र प्रदर्शित होण्याबद्दलचा अनुभवही तिने सांगितला. यावेळी ती म्हणाली, "अनन्या या चित्रपटाचे शूटींग २०२० मध्ये मार्चपूर्वी आणि टाइमपास ३ या चित्रपटाचे शूट हे दुसऱ्या लॉकडाऊनपूर्वी झाले होते. मला या चित्रपटाच्या प्रदर्शनाबद्दल काहीही माहिती नव्हतो. ते कधी प्रदर्शित होणार आहे, याबद्दलही काही माहिती नव्हते. तर दुसरीकडे मी आठवड्याचे सहा दिवस सलग मालिकांमुळे घराघरात दिसायची. एकीकडे दिपू, अनन्या आणि पालवी या तिन्ही भूमिका साकारता आल्या यासाठी मी स्वतःला नशिबवान समजते."



# जिओ स्टुडिओज प्रस्तुत "मी वसंतराव" या संगीतप्रधान चित्रपटाने गाठला शंभर दिवसांचा टप्पा...

**आत्तापर्यंत जिओ स्टुडिओजने भारतातील विविध भाषांमधून वैविध्यपूर्ण शैलीतील चित्रपट आणि वेबसिरिजमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आणि आता मराठी मनोरंजनविश्वात आपली वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी जिओ स्टुडिओज सज्ज झालं आहे.**










यावर्षी प्रदर्शित झालेला जिओ स्टुडिओजची प्रस्तुती असलेला "मी वसंतराव" या संगीतप्रधान चित्रपटाने सिनेमागृहात शंभर दिवसांचा टप्पा गाठला. याबरोबरच या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक (राहुल देशपांडे) आणि सर्वोत्कृष्ट ऑडिओग्राफी साउंड डिझायनर (अनमोल भावे) असे दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. या पुरस्कारांबरोबच या चित्रपटाचे अनेक स्तरातून कौतुक झाले. आणि आता पुढील टप्पा म्हणजे येणाऱ्या काळात जिओ स्टुडिओज मराठी दिग्गज कलाकारांच्या समवेत चित्रपट आणि वेब सिरीजची निर्मिती करणार आहे. यात महेश मांजरेकर, प्रशांत दामले, सुकन्या कुलकर्णी, सयाजी शिंदे, सुबोध भावे, जितेंद्र जोशी, भाऊ कदम, केदार शिंदे, अंकुश चौधरी, राहुल देशपांडे, हृता दुर्गुळे, अश्या मराठीतील अनेक प्रतिभावान कलाकारांचा समावेश असणार आहे.

महत्वाचं म्हणजे यात वैविध्यपूर्ण प्रकारच्या शैलीतील प्रोजेक्ट्स असणार आहेत, अगदी कॉमेडीपासून ते थ्रिलर्सपर्यंत, सत्य घटनांवर आधारित गोष्टींपासून ते प्रेमकथांपर्यंत, ज्या सर्व मराठी प्रेक्षकांचे मनोरंजन करतील.

यातील आगामी प्रोजेक्ट म्हणजे अभिनेता भाऊ कदम आणि भूषण पाटील अभिनीत 'घे डबल' हा धमाकेदार कॉमेडी चित्रपट येत्या ३० सप्टेंबर रोजी सिनेमागृहात प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विश्वास जोशी यांनी केले असून जिओ स्टुडिओज व फाईन क्राफ्ट निर्मित या चित्रपटात भाऊ कदम पहिल्यांदाच दुहेरी भूमिका असणार आहे. त्यानंतर सध्या चर्चेत असलेला आणि अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चित्रपट 'गोदावरी' हा ११ नोव्हेंबर रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, या चित्रपटाची निर्मिती ब्ल्यू ड्रॉप फिल्म्स आणि जितेंद्र जोशी पिक्चर्स यांनी केली आहे. या चित्रपटात जितेंद्र जोशी यांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. त्याचबरोबर यात विक्रम गोखले, नीना कुलकर्णी, संजय मोने आणि प्रियदर्शन जाधव असे प्रतिभाशाली कलाकारांनी महत्वाची भूमिका साकारली आहे.

२०२३ या नववर्षाची सुरुवात दिग्दर्शक केदार शिंदे यांच्या खुमासदार शैलीने नटलेला "बाईपण भारी देवा" या चित्रपटाने होणार आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, माधुरी भोसले निर्मित हा चित्रपट नववर्षात ६ जानेवारी २०२३ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात रोहिणी हट्टंगडी, वंदना गुप्ते, सुकन्या कुलकर्णी, दीपा परब, शिल्पा नवलकर आणि सुचित्रा बांदेकर अशा उत्तमोत्तम कलाकारांची धमाल प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे.

या चित्रपटासंदर्भात सुकन्या कुलकर्णी-मोने म्हणाल्या, "ही कथा एका प्रत्येक बाईची असून, या चित्रपटातील अप्रतिम सह-कलाकारांसोबत स्क्रीन शेअर करणे हा एक आनंददायी अनुभव होता. आणि मला या आनंददायी चित्रपटाचा भाग बनवल्याबद्दल मी केदारचे आभार मानते".

निपुण धर्माधिकारी आणि वैदेही परशुरामी यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'एक दोन तीन चार' हा चित्रपट नवीन वर्षातील फेब्रुवारी महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. आणि महत्वाचं म्हणजे या चित्रपटाचं दिग्दर्शन वरुण नार्वेकर यांनी केलं आहे, ज्यांचा बहुचर्चित 'मुरांबा' या चित्रपटानंतरचा हा पुढील चित्रपट असणार आहे. ही एका तरुण जोडप्याची सरप्राईज लव्हस्टोरी आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, बहावा एंटरटेन्मेंट आणि १६ बाय ६४ प्रॉडक्शन अंतर्गत, रणजीत गुगले, केयूर गोडसे, निपुण धर्माधिकारी, निरज बिनीवाले निर्मित हा चित्रपट प्रेक्षकांचं फुल टू मनोरंजन करेल यात शंका नाही.

या नंतर जिओ स्टुडिओज प्रस्तुत बहुचर्चित 'उनाड' हा चित्रपट २०२३च्या उन्हाळ्यात सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. आदित्य सरपोतदारने या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. तर, ज्योती देशपांडे, अजित अरोरा, चंद्रेश भानुशाली आणि प्रितेश ठक्कर निर्मित 'उनाड' हा चित्रपट तरूणांवर चित्रीत असून यात आशुतोष गायकवाड, हेमल इंगळे, अभिषेक भराटे, चिन्मय जाधव, देविका दफ्तरदार आणि संदेश जाधव हे कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. झेक रिपब्लिक येथे पार पडलेल्या झ्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात युवा विभागातील फिचर फिल्म्सच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरीता अधिकृत प्रवेशिका म्हणून 'उनाड'ची नुकतीच निवड झाली आहे.

यासह जिओ स्टुडिओजने एका थ्रिलर चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटाचे नाव '4 BLIND MEN'(४ ब्लाइंड मेन) असे आहे. हा चित्रपट चार अंध व्यक्ती आणि हत्ती यांवर आधारित बोधकथेवर चित्रित केला आहे. नितीन वैद्य निर्मित आणि अभिषेक मेरुकर दिग्दर्शित या चित्रपटात अंकुश चौधरी मुख्य भूमिकेत झळकत असून सोबतच शुभंकर तावडे, संकर्षण कऱ्हाडे, शेखर दाते व मृण्मयी देशपांडे या दिग्गज कलाकारांची फौज झळकत आहे.

चित्रपटासह जिओ स्टुडिओज मराठी डिजिटल विश्वातही आपला ठसा उमटवण्यास सज्ज झालं आहे. 'एका काळेचे मणी' ही एक धमाल वेबसिरीज जिओ स्टुडिओज घेऊन येत असून, एका चित्र-विचित्र पात्रांची आणि परिवाराची आगळीवेगळी कथा असणार आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते महेश मांजरेकर यांनी या मालिकेची निर्मिती केली असून या वेबसिरीजचे दिग्दर्शन अतुल केतकर यांनी केले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### भारतीय चाहत्याने अर्शदीप सिंगला 'गद्दार' म्हटलं,

आशिया । महाईन्यूज

आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाच्या कामगिरीवरून चाहते निराश आहेत. या स्पर्धेत भारताला दोनवेळा पराभवाचा सामना करावा लागला. सुपर फोरच्या सामन्यात भारताचा पहिल्यांदा पाकिस्तान तर दुसऱ्यांदा श्रीलंकेकडून पराभव सामना करावा लागला. या सामन्यानंतर भारतीय खेळाडूंना चाहत्यांच्या रोषाला सामारे जावं लागत आहे. भारतीय युवा गोलंदाज अर्शदीप सिंगला समाज माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात येतं आहे. त्यात आता एका चाहत्याने अर्शदीपला मैदानाबाहेर पडताना गद्दार म्हणल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओत भारतीय खेळाडू बसमध्ये बसताना दिसत आहे. तेव्हा अर्शदीप बसजवळ आल्यावर तिथे उभे असलेल्या एका चाहत्याने 'बघा गद्दार आला' अशी टिप्पणी केली. अर्शदीप सिंगने हे शब्द ऐकले आणि गद्दार बोलणाऱ्याकडे रोखून पाहिलं. तेव्हा बसजवळ उभे असलेल्या एका भारतीय पत्रकाराने गद्दार उच्चारणाऱ्याला खडेबोल सुनावले.

# भारताच्या आशा संपुष्टात!

## अफगाणिस्तानवर पाकिस्तानची अविश्वसनीयरीत्या मात

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

आशिया चषक २०२२ च्या चौथ्या फेरीत अफगाणिस्तान विरुद्ध पाकिस्तान यांच्यात शारजाह क्रिकेट स्टेडियमवरती सामना पार पडला. या सामन्यात अफगाणिस्तानने पाकिस्तानला १३० धावांचे लक्ष ठेवलं होते. मात्र, अफगाणिस्तानने दिलेल्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करताना पाकिस्तानने 19.2 षटकात १ गडी राखून विजय मिळवला आहे. युवा गोलंदाज नसीम शाहने अखेरच्या षटकात दोन षटकार लगावत पाकिस्तानला विजय मिळवून दिला.


पाकिस्तानने नाणेफेक जिंकत गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या अफगाणिस्तानच्या फलंदाजांनी चांगली सुरुवात केली. पण, कर्णधार मोहम्मद नबी वगळता प्रत्येक खेळाडूनं १० ते २० मध्येच धावा ठोकल्या. तर, नजीबुल्ला जद्रानने सर्वाधिक ३५ धावा केल्या. हरिस रौफने चार षटकात दोन



बळी घेतले. अफगाणिस्तानने २० षटकात १२९ धावा केल्या. रोहितला सूर्यकुमार यादवने साथ दिली. सूर्यकुमारने २९ चेंडूंमध्ये एक षटकार आणि एक चौकार लगावत ३४ धावा केल्या. रोहित आणि सूर्यकुमार वगळता भारताचा कोणताही खेळाडू खास कामगिरी करू शकला नाही. हार्दिक पंड्या, ऋषभ पंतने प्रत्येकी १७ धावा केल्या. दीपक हुडा अवघ्या ३ धावांवर बाद झाला. आर अश्विनने (नाबाद) शेवटच्या षटकांत मोठा फटका मारला. त्याने ७ चेंडूंमध्ये १५ धावा केल्या. भारताच्या वेगवान गोलंदाजांच्या तुलनेत फिरकीपटुंनी उत्तम कामगिरी केली.एकट्या युझवेंद्र चहलने श्रीलंकेच्या ११० धावा होईपर्यंत तीन फलंदाजांना बाद केले. त्याने एकूण तीन बळी घेतले. आर अश्विनने युझवेंद्रला साथ दिली. अश्वनने एक बळी घेतला. अफगाणिस्तानने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना प्रत्त्युतरात उरतलेल्या पाकिस्तानची सुरूवात चांगली झाली नाही. दुसऱ्याच चेंडूवर कर्णधार बाबर आझम भोपळा न फोडता माघारी परतला. त्यानंतर धावा काढताना फखर झमान बाद झाला. टी-२० क्रमवारीत पहिल्या स्थानी गेलेला मोहम्मद रिझवानही २० धावा करून स्वत:त माघारी गेला. त्यानंतर इफ्तिखार अहमदने ३० ( ३३ ), शादाब खान ३६ ( २६ ), मोहम्मद नवाझ ४ ( ५ ), खुशदील शाह १ ( ३ ), हरिस रौफ ० ( १ ) धावा केल्या.

# बाबर आझमला मागे टाकत 'हा' पाकिस्तानी खेळाडू बनला टी-२० 'किंग'!

।।नवी दिल्ली। महाईन्यूज ।



आशिया चषकात पाकिस्तान संघाची कामगिरी लयबद्ध पद्धतीने सुरू आहे. या स्पर्धेत झालेल्या ३ सामन्यांमध्ये पाकिस्तानचा खेळाडू मोहम्मद रिझवानने आक्रमक फलंदाजी केली. त्याने ३ सामन्यांत दोन वेळा अर्धशतकी खेळी करत १९२ धावा ठोकल्या. त्यात आता आयसीसीने टी-२० क्रमवारी जाहीर झाली आहे. त्यामध्ये आयसीसीने मोहम्मद रिझवानला सुखद धक्का दिला आहे.

आयसीसी टी-२० क्रमवारीत पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला मोहम्मद रिझवानने मागे टाकलं आहे. टी-२० क्रमवारीत रिझवान हा पहिल्या क्रमांकाचा फलंदाज बनला आहे. तर, बाबर आझम दुसऱ्या स्थानी गेला आहे. दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज एडन मार्करम तिसऱ्या, तर चौथ्या क्रमांकावर भारतीय फलंदाज सूर्यकुमार यादव आहे. आशिया चषक स्पर्धेत रिझवान जबरदस्त फॉर्ममध्ये दिसला. तर, या स्पर्धेत बाबर आझमने मोठी धावसंख्या उभारली नाही. त्यामुळे बाबरला रिझवानसाठी आपली एक नंबरची जागा सोडावी लागली आहे. बाबर ११५५ दिवस टी-२० क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर होता. तसेच, रिझवान हा तिसरा पाकिस्तानी फलंदाज आहे, जो टी-२० क्रमवारीत पहिल्या क्रमाकांवर गेला आहे. यापूर्वी, बाबर आझम आणि मिस्बाह उल-हक यांनी ही कामगिरी केली होती. टी-२० क्रमवारीत ८१५ गुणांसह मोहम्मद रिझवान प्रथम स्थानी आहे. बाबर आझम ७९४ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. मार्करमने सूर्यकुमार यादवा मागे टाकल तिसरा क्रमांक पटकवला आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही